नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १२/०७/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## चोरी

**पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा कवठा शिवार येथे दिनांक २६/०६/२०२२ ते ११/०७/२०२२ सुमारास फिर्यादी नामे— आशिष रमेशराव बेलोरकर, वय ६२ वर्ष, रा. प्लॅाट नं ६७, कांचन गित अपार्टमेंट, शिवाजी नगर नागपूर यांचे मालकिचे बंद मँगनीज खदानवरील रुम समोरील लावलेले व ठेवलेले १) सौरउर्जेच्या ०२ प्लेटा किंमती ६,०००/—रू., २) अल्युमीनीयम चे स्ट्रीट लाईट पोल किंमती २०,०००/—रू., ३) लोखंडी ३८ लहान मोठे घन किंमती २०,०००/—रू. असा एकुण किंमती ४६,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अमर झिने मो.नं. ८१८०९७६१२५ हे करीत आहे.

## फसवणुक

१) **पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील इंदीरा नगर कन्हान येथे दिनांक ०४/७/२२ चे ११.४१ वा. दिनांक १८/०७/२२ चे ०९.५९ वा. दरम्यान फिर्यादी नामे— नरेश कचरूजी बर्वे, वय ५० वर्ष, रा. इंदिरा नगर, कन्हान यांनी मॅरेज ब्यूरो नी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर बोलने करून लग्नाबाबत संपूर्ण माहिती दिली असता लग्नाचे स्थळ व पंसत आहे म्हणून रजिस्टर फिस ५,०००/—रू. तसेच लग्नाचे हॉल रजिस्टर फिस ५,०००/—रू. पांडित व जेवनाचा खर्च व रजिस्टर फिस ५,०००/—रू व मुलगी शोध म्हणून रजिस्टर फिस ५,०००/—रू. असे एकुण १५,०००/—रू. भरून इसमाने त्यास खोटे बोलून फसवणूक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादवी सहकलम ६६ ड माहिती तंत्रज्ञान अधीनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री विलास काळे हे करीत आहे.

२) **पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत २ कि.मी. अंतरावरील रॉयनगर कन्हान येथे दिनांक ०९/०७/२०२२ चे १०.०० वा. ते १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— विनोद वामनराव हूमने वय ५२ वर्ष, रा. रॉयनगर कन्हान हे घरी हजर असतांना त्यांना अज्ञात आरोपीने फोन करून म्हटले कि, 'क्रेडिट कार्ड वापरत नाही, क्रेडिट कार्ड बंद करायचे आहे का'? फिर्यादीने क्रेडिट कार्ड बंद करण्यास सांगितले असता आरोपीने टेक्स मॅसेज पाठविले ते टेक्स मॅसेज डॉउनलोड केले व ओटीपी पाठविले असता फिर्यादीचे अकाउंट मधून १,७३,०००/—रू. ऑनलाईन पद्धतीने काढुन घेत फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादवी सहकलम ६६ ड माहिती तंत्रज्ञान अधीनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री विलास काळे हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**